# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

-----------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक १९ मार्च, २०२५ / फाल्गुन २८, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | वैद्यकीय शिक्षण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (३) | मृद व जलसंधारण मंत्री | |
| (४) | उद्योग, मराठी भाषा मंत्री | |
| (५) | महिला व बालविकास मंत्री | |
| (६) | ग्रामविकास व पंचायत राज मंत्री | |
| (७) | कामगार मंत्री | |
| (८) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |

-----------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २४**

-----------------------------------------------

**बारवी धरणाकरीता संपादित केलेल्या जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना मिळणेबाबत**

**(१) * १४७१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)अंबरनाथ/बदलापूर (जि.ठाणे) येथील बारवी धरणाकरीता जमिनी दिलेल्या स्थानिक शेतकऱ्यांना अद्याप पुरेसा मोबदला मिळाला नसल्याचे माहे जुलै, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एकाला नोकरी किंवा १० लाख रुपये इतकी रक्कम अदा करण्याचा निर्णय झाला असताना प्रकल्पग्रस्तांना याचा लाभ अद्याप मिळाला नसल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) बारवी धरण विस्तार योजने अंतर्गत मौजे- मानिवली, (शिरवली), तोंडली, मोहघर, मांडवे, सासणे, बोरिवली, कान्होळ, काचकोळी, फणसोली व कोळेवडखळ (ता. मुरबाड, जि. ठाणे) येथील २६६.६० हे. आर या जमिनींची नुकसान भरपाई रक्कम रू. ३.७५ लाख प्रती हेक्टर निवाडे सन २००५ ते २००७ या कालावधीत पारित करण्यात आला. तथापि प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळाने दि. २३/०८/२०१९ रोजीच्या ३८३ व्या बैठकीत विषय ठराव क्र. ५९६३ नुसार व्याजदर निश्चित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔवि महामंडळ यांना देण्यात आले. त्याअनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना व्याज अदा करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

एकूण १२०४ पैकी ५७८ प्रकल्पबाधितांना मऔवि महामंडळाच्या तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पाणी वापराच्या समन्यायी तत्वावर सेवेत समावून घेतले आहे. ३१ प्रकल्पबाधितांच्या विनंतीनुसार, नोकरी ऐवजी रु.१० लाख अदा करण्याबाबत उपजिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्याकडून पात्र करण्याबाबत आलेल्या प्रकल्पग्रस्तांना मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांनी रु. १० लाख अदा करण्यास मंजूरी प्रदान केली आहे. त्यांपैकी १६ प्रकल्प बाधितांना रु. १० लाख धनाकर्षाद्वारे अदा करण्यात आले आहे व एका प्रकल्पबाधिताने रोख रकमेऐवजी नोकरी मिळावी यासाठी अर्ज केलेला आहे. उर्वरित १४ प्रकल्पबाधितांना रु. १० लाख अदा करण्याबाबतची कार्यवाही मऔवि महामंडळामार्फत सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**निवाणे (ता. कळवण, जि.नाशिक) येथील गॅटेड सिमेंट बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२) * ४७३४ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवाणे (ता. कळवण, जि.नाशिक) येथील सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मंजूर झालेल्या गॅटेड सिमेंट बंधाऱ्याला दोन महिन्यांत गळती लागल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधाऱ्याचे बांधकाम करताना कामाच्या अंदाजपत्रकाचा फलक लावणे बंधनकारक असताना असा फलक कंत्राटदारांकडून लावण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत व दोषी असणाऱ्या संबंधित कंत्राटदारास काळया यादीत टाकून उक्त कामांची देयके अदा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने बंधाऱ्याची दुरुस्ती करुन संबंधति दोषी अधिकारी व कंत्राटदारांविरुध्द कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

दि. २०/०२/२०२५ रोजी क्षेत्रिय अधिकारी व स्थानिक ग्रामस्थ यांच्या उपस्थित केलेल्या पाहणीनुसार सद्य:स्थितीत बंधाऱ्यात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा असून बंधाऱ्यातून कोणत्याही प्रकारची गळती झाल्याचे आढळून आले नाही.

(२) हे खरे नाही.

सदर योजनेचा नामफलक लावण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.

सदर योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर बंधारा देखभाल व दुरुस्तीकरीता ग्रामपंचायत निवाणे, ता. कळवण यांच्या ताब्यात देण्यात आलेला असून ग्रामपंचायत निवाणे येथील सरपंच, ग्रामसेवक, स्थानिक नागरिक व शेतकरी यांनी समक्ष पाहणी करुन बंधाऱ्याचे काम गुणवत्तापूर्वक पूर्ण केल्याची खात्री केल्यानंतरच बंधारा देखभाल व दुरुस्तीकरीता ताब्यात घेण्यात आलेला आहे.

(४) सदर कामे गुणवत्तापूर्वक व चांगल्या प्रतीची झाली असल्याने सबंधित कंत्राटदारास काळया यादीत टाकणे व कामांची देयके अदा करणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाहीची आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात कुष्ठरोग निर्मूलन करण्यासाठी उपाययोजना करणेबाबत**

**(३) * ५१८ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी सन १९५५-५६ मध्ये सुरु केली असली तरीही अद्यापही मोठया प्रमाणात कुष्ठरुग्ण आढळून येत असून माहे एप्रिल, २०२३ ते मार्च, २०२४ या कालावधीत २० हजार कुष्ठरोग रुग्ण आढळले असून आरोग्य विभागाच्या सर्वेक्षणानुसार कुष्ठरोग निमूर्लन करण्यात आलेल्या ठिकाणीही कुष्ठरोगाचा प्रसार होत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात कुष्ठरोगांसाठी कार्य करणाऱ्या आनंदवन, तपोवन व इतर सेवाभावी संस्थांना कुष्ठरोगाची देखभाल व औषधोपचार करण्यासाठी प्रती रुग्ण देण्यात येणारे अनुदान अत्यंत अल्प असून त्यामध्ये गत १२ वर्षात कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याने संस्थाना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाने सन २०१४ मध्ये कुष्ठरूग्णांच्या पुर्नवसनासाठी सर्वकष योजना (पॉलिसी) तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासनावर दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुष्ठरोगाचे पूर्णत: निर्मूलन करण्यासह कुष्ठरोग प्रसारावर आळा घालणे तसेच कुष्ठरोगांसाठी कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना प्रती रूग्ण देण्यात येणारे अनुदान वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राज्यात माहे एप्रिल, २०२३ ते मार्च, २०२४ या कालावधीत एकूण २०,००१ नवीन कुष्ठरुग्ण आढळले आहेत व त्या सर्वांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात आले आहे. राज्यातील कोणत्याही भागात कुष्ठरोग निर्मूलन करण्यात आल्याचे अद्याप घोषित करण्यात आलेले नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक कुनिका-२०११/प्र.क्र.३२१/आरोग्य-५, दिनांक २१ मार्च, २०१२ अन्वये राज्यात कुष्ठरुग्णांसाठी कार्य करणाऱ्या रुग्णालयीन तत्वावरील १३ स्वयंसेवी संस्थांना दरमहा प्रती कुष्ठरुग्ण रुपये २२००/- आणि पुनर्वसन तत्वावरील १६ स्वयंसेवी संस्थांना दरमहा प्रती कुष्ठरुग्ण रुपये २०००/- इतके अनुदान शासनाकडून सध्या देण्यात येते.

मात्र राज्यात कुष्ठरुग्णांसाठी रुग्णालयीन व पुनर्वसन तत्वावर कार्य करणाऱ्या सेवाभावी स्वयंसेवी संस्थांना प्रती कुष्ठरुग्ण शासनाकडून सध्या दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडून नियोजन व वित्त विभागाकडे सादर करण्यात आला आहे.
(३) हे खरे आहे.

(४) राज्यात कुष्ठरोगावर आळा घालण्यासाठी राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार नवीन कुष्ठरुग्ण शोधून त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणून कुष्ठरोगाच्या प्रसाराची साखळी खंडीत करण्यावर राज्यात भर देण्यात येत आहे. त्यानुसार, राज्यात नियमित सर्वेक्षणासह अतिजोखमीच्या लोकसंख्येत कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) ही मोहिम सन २०२३ पासून दरवर्षी राबविण्यात येत आहे.

तसेच, यापूर्वी निदान झालेल्या कुष्ठरुग्णांच्या सहवासात असलेल्या व्यक्तींचीही कुष्ठरोगासाठी तपासणी करण्यात येत आहे. तसेच, केंद्र शासनाकडील मार्गदर्शक सुचनेनुसार राज्यात दरवर्षी कुष्ठरुग्ण शोध मोहिमही राबविण्यात येत आहे. तसेच, मागील वर्षामध्ये शुन्य कुष्ठरुग्ण असलेल्या गावांमधील सर्व जनतेची कुष्ठरोगासाठी तपासणी करण्यात येत आहे.

तसेच, कुष्ठरोगाविषयी समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी दरवर्षी स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान राबविण्यात येते व यामध्ये दिनांक २६ जानेवारी रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये कुष्ठरोगाविषयी शास्त्रीय माहिती देण्यात येते.

तसेच, स्पर्श कुष्ठरोग जनजागृती पंधरवडयादरम्यान जिल्हास्तरावर रॅली, शाळा व महाविद्यालयांमध्ये कुष्ठरोगविषयक निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व प्रश्न मंजुषा स्पर्धा, महिला मंडळ सभा, हस्तपत्रिका वाटप, मेगाफोनव्दारे प्रचार, आरोग्य पत्रिकेत लेख, पथनाटय इ.चे आयोजन करण्यात येते. तसेच, जिल्हा व तालुका मुख्यालयाच्या वर्दळीच्या ठिकाणी कुष्ठरोगविषयक होर्डिंग्सद्वारे जनजागृती करण्यात येते. आरोग्य संस्था व शासकीय कार्यालयाच्या ठिकाणी मराठीतील बॅनर पोस्टरद्वारे जनजागृती करण्यात येते. मोक्याच्या ठिकाणी भिंतीवर कुष्ठरोगविषयक संदेश लिहून जनजागृती करण्यात येते. तसेच आरोग्य कर्मचारी व आशा कार्यकर्तीव्दारे गृहभेटीदरम्यान प्रत्यक्ष भेटी देवून कुष्ठरोगाविषयी जनजागृती करण्यात येते.

राज्यात कुष्ठरुग्णांसाठी रुग्णालयीन व पुनर्वसन तत्वावर कार्य करणाऱ्या सेवाभावी स्वयंसेवी संस्थांना प्रती कुष्ठरुग्ण शासनाकडून सध्या दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडून नियोजन व वित्त विभागाकडे सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्यांच्या कामांत झालेले गैरव्यवहार

**(४) * २५६० श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा व धडगाव (जि. नंदुरबार) तालुक्यातील शेकडो गावे, पाडे हे रस्त्यांपासून वंचित असून यासाठी निधी देखील उपलब्ध नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात काही ठिकाणी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असून रस्त्यांची कामे देखील निकृष्ट दर्जाची झाल्यामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात रस्त्यांच्या कामांना मंजूरी, निधी तसेच गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्यांच्या कामांना मंजूरी, निधीची उपलब्धता, निकृष्ट रस्त्यांची दुरुस्ती करणेसह यातील दोषी कंत्राटदार व अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या टप्पा-१ मधील धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील ७७ कामे मंजूर होती, त्यापैकी ६८ कामे पूर्ण झाली असून ९ कामे प्रगतीपथावर आहेत. सदरहू ६८ कामांबाबत राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्यामार्फत नियमितपणे तपासणी करून समाधानकारक शेरा प्राप्त झाला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाकडून नियमित औषध पुरवठा करणेबाबत**

**(५) * १५७८ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरोग्य विभागात औषध खरेदीत वारंवार होणारे घोटाळे आणि रुग्णालयांना औषधांचा पुरवठा होण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी आरोग्य सेवा आयुक्त, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागांतर्गत येणाऱ्या संस्थांसाठी व रुग्णालयांसाठी औषध खरेदीची जबाबदारी हाफकिन या संस्थेकडे देण्याचा निर्णय शासनाने घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीमध्ये वैद्यकीय शिक्षण विभागाकडून हाफकिनला देण्यात आलेल्या रु.४,२९८ कोटी निधीपैकी रु.२,०५२ कोटी निधी खर्च करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, आरोग्यसेवा संस्थांनी उक्त कालावधीमध्ये मागणी केलेल्या वस्तूंपैकी ७१ टक्के वस्तूंचा पुरवठाच हाफकीनने केला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतचे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये देखील नोंदविलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात औषधांचा नियमित पुरवठा करणेसह यातील दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागातील रुग्णालयांना लागणारी औषधे व यंत्रसामुग्री खरेदी सन २०१७-१८ या वर्षापासून शासकीय रुग्णालयात हाफकिन मार्फत करण्यात येत होती. मात्र, सन २०२३ मध्ये वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाची स्थापना झाली असल्याने सदर खरेदी त्या प्राधिकरणाकडून करण्यात येत आहे.
(२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने सन २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीमध्ये हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला एकूण रु.२६५३.७७ कोटी एवढा निधी औषधे, सर्जिकल साहित्य, रसायने, उपकरणे इत्यादी बाबींच्या खरेदीसाठी उपलब्ध करुन दिला आहे. त्यापैकी रु.१३१८ कोटी खर्च झाले असून रु.९५७.१२ कोटी एवढा अखर्चित निधी शासनाला परत केला आहे. उर्वरित रु.३७८.४० कोटी पैकी रु.२९६ कोटीची प्रलंबित देयके तसेच सुरु असलेल्या खरेदीचे देयके अदा करण्यात येणार आहेत. त्यामुळे साधारण रु.८०.०० कोटी निधी शिल्लक राहणार आहे.

(३) व (४) हाफकिन महामंडळाकडे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाशिवाय सार्वजनिक आरोग्य विभाग व राष्ट्रीय आरोग्य अभियानाने सन २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत रु.१७३१ कोटी निधी औषधे व उपकरणे खरेदी करिता वर्ग करण्यात आला त्यापैकी रु.१४०० कोटी एवढा खर्च झाला आहे.

महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेला मुद्दा हा प्रत्यक्ष औषध खरेदी संदर्भात नसून औषध खरेदीसाठी संक्षिप्त देयकांवर काढलेल्या रक्कमेचे तपशिलवार देयके सादर न केल्याबाबत आहे.

(५) महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने प्रलंबित तपशिलवार देयके सादर करण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात ग्लायसीकॅल-बी १२ या कॅल्शियमच्या सिलबंद सिरपला बुरशी लागल्याबाबत

**(६) * १३६८ श्री.संजय देरकर (वणी), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :**सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील खैरगाव प्रा.आ.केंद्र, सावरगाव (ता.कळंब), अकोला बाजार (ता.यवतमाळ), घारफळ (ता.बाभूळगाव) या तसेच इतर ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात ग्लासीअर फार्मास्युटिकल्स प्रा.लि., अमरावती या कंपनीकडून पुरवठा करण्यात आलेले ग्लायसीकॅल-बी १२ या कॅल्शियमच्या सिलबंद सिरपला बुरशी लागल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील सरकारी रुग्णालयात विशेषत: नागपूर, बीड, यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुणवत्ता नसलेल्या औषधांचा पुरवठा करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार माहे डिसेंबर,२०२४ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी असलेल्या पुरवठादार कंपनी व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) कॅल्शियमच्या सिलबंद सिरपला बुरशी लागल्याचे दिसून येत नाही, तथापि Foreign Particle आढळून आले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

माहे डिसेंबर, २०२४ व त्या दरम्यान राज्यातील काही जिल्हयांतील शासकीय रुग्णालयांमध्ये अप्रमाणित औषधांचा पुरवठा झाल्याची बाब उघडकीस आली आहे.

नागपूर व बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या औषधांचा दर्जा चांगला असून या औषधांच्या संदर्भात अद्याप कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) यवतमाळ जिल्ह्यात माहे नोव्हेंबर ते डिसेंबर,२०२४ मध्ये काही रुग्णालयामधील कॅल्शियम सिरपच्या बॉटल्स मध्ये Foreign Particle आढळून आले असून त्यांचा पुरवठा व वापर तात्काळ थांबविण्यात आला आहे. सहायक आयुक्त, अन्न आणि औषधी प्रशासन यांच्याकडून दि. ०३.०१.२०२५ रोजी सदर औषधांचा नमूना चाचणी / विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आला आहे. सदर तपासणी अहवाल प्राप्त होताच प्रचलित नियमानुसार संबधिताविरुद्ध पुढील कारवाई करण्यात येईल. सद्यस्थितीत सर्व कॅल्शियम सिरपचा साठा जिल्हास्तरावर सिलबंद करून ठेवण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी मुलांच्या पोषण आहाराच्या खर्चात वाढ करणेबाबत

**(७) * ३३१३ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १,०३,००० अंगणवाडया असून यामधून सुमारे ६० लाखांपेक्षा अधिक बालकांना देण्यात येणाऱ्या पोषण आहाराकरीता केंद्र शासनाने सन २०१७ पासून प्रति लाभार्थी रु.८ इतका खर्च दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ७ वर्षांत यात कोणतीही वाढ करण्यात आलेली नसून गत अर्थसंकल्पात (सन २०२४-२५) सक्षम अंगणवाडी व पोषण २ या शीर्षकांतर्गत सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय वर्षात तरतूद रु.२१,५२३ हजार कोटी इतक्या रकमेच्या तुलनेत वाढलेल्या महागाईच्या पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पीय तरतूद वाढविण्याऐवजी रु. ३२३ कोटीं इतकी कपात करून फक्त रु.२१,२०० हजार कोटी इतकी तरतूद करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आदिवासी जिल्ह्यांमध्ये असलेली बाल कुपोषणाची समस्या गेल्या काही वर्षांत शहरी भागातही झपाट्याने वाढत असल्याने त्यावर मात करण्यासाठी "ग्रामीण बाल विकास केंद्र योजने"च्या धर्तीवर अतितीव्र कुपोषित बालकांसाठी 'नागरी बाल विकास केंद्र' सुरू करणे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, ग्रामीण भागात अंगणवाडीस्तरावर ग्रामबाल विकास केंद्र योजना कार्यान्वित असल्याने अंगणवाडी मुलांच्या पोषण आहाराचा खर्च वाढविणे अत्यंत आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अंगणवाडी मुलांच्या पोषण आहाराचा खर्च वाढविणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजनेंतर्गत पुरक पोषण आहाराचे दर केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात येतात. पुरक पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी केंद्र व राज्य हिश्याच्या निधीचे प्रमाण ५०:५० असे आहे. सन २०१३ मध्ये पुरक पोषण आहाराचे दर प्रति लाभार्थी प्रति दिन रु. ६ इतके होते. सदरचे दर सन २०१७ मध्ये प्रति लाभार्थी प्रति दिन रु.८ इतके करण्यात आले. सद्य:स्थितीत पुरक पोषण आहाराच्या दरामध्ये बदल झाला नसून प्रति लाभार्थी प्रति दिन रु.८ इतके प्रमाणे आहार पुरवठा सुरु आहे.

(२) सदर बाब केंद्र शासनाशी संबंधित आहे. केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरील उपलब्ध माहितीनुसार सक्षम अंगणवाडी व पोषण २ या शीर्षकांतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात अंतिम मंजूर तरतूद रुपये २१,८०९ कोटी एवढी होती. तर सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता सुधारित अंदाजानुसार रुपये २०,०७० कोटी एवढी तरतूद मंजूर होती. तथापि, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता रुपये २१,९६० कोटी एवढी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे.

(३) ग्राम बाल विकास केंद्रांच्या धर्तीवर नागरी भागातील अति तीव्र कुपोषित बालकांकरिता नागरी बाल विकास केंद्र सुरू करण्यास शासन निर्णय दिनांक ५ मार्च, २०२४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) व (५) पुरक पोषण आहाराच्या दरामध्ये वाढ करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनधिकृत, अनोंदणीकृत तसेच विहित नियमांचे पालन न करणाऱ्या नर्सिंग होमवर कायदेशीर कारवाई करणेबाबत

**(८) * ४२१८ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठया प्रमाणात अनधिकृत व अनोंदणीकृत नर्सिंग होम व क्लिनीक सुरु असून यामुळे नागरिकांचे आरोग्य व जीव धोक्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नर्सिंग होम किंवा क्लिनीकसाठी शासनाची परवानगी व नोंदणी आवश्यक असून त्यामध्ये कार्यरत असलेले डॉक्टर, सहाय्यक, तंत्रज्ञ, कर्मचारी हे अनुभवी व प्रशिक्षित असल्याबाबतची तपासणी करण्याची जबाबदारी आरोग्य विभागाची असतानाही त्याची कुठलीही माहिती प्रशासनाकडे उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात आरोग्य विभागामार्फत १९,३८८ नोंदणीकृत खाजगी रुग्णालयांची तपासणी केली असता २,९३६ रुग्णालयांत अभिलेखे अद्ययावत ठेवणे, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नसणे, फायर व इलेक्ट्रिक ऑडिट यासह सेवा सुविधांमध्ये कमतरता अशा अनेक त्रुटी निदर्शनास आल्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आग प्रतिबंधित आणि जीवसुरक्षा कायद्यांतर्गत रुग्णालयांना दर ६ महिन्यांनी फायर ऑडीट करणे सक्तीचे असूनही अनधिकृत नर्सिंग होममध्ये त्याची अंमलबजावणी होत नाही तसेच रुग्णांना उपलब्ध होणारी वैद्यकीय सुविधा व औषधे मान्यता प्राप्त आहेत का याची देखील तपासणी अशा रुग्णालयात होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अशा सर्वच खाजगी रुग्णालये, नर्सिंग होमची सखोल चौकशी करुन अनधिकृत, अनोंदणीकृत तसेच विहित नियमांचे पालन न करणाऱ्या नर्सिंग होमवर कायदेशीर कारवाई करणे, त्रुटी आढळलेल्या खाजगी रुग्णालयांमध्ये सुधारणा करणेबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत ३९ व कोल्हापूर जिल्ह्यात २ अनोंदणीकृत नर्सिंग होम आढळून आले आहेत.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र शुश्रुषा गृह नोंदणी अधिनियम, १९४९ मधील अटी व शर्तीनुसार राज्यातील नर्सिंग होमची नियमितपणे तपासणी करण्यात येते आणि अनधिकृत नर्सिंग होम आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येते.

(३) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी अधिनियम, १९४९ मधील तरतूदीनुसार दि. २० फेब्रुवारी, २०२५ पर्यंत राज्यातील २३०१४ रुग्णालयांची तपासणी करण्यात आली असून ४५३८ रुग्णालयांमध्ये त्रुटी आढळल्याने रुग्णालय चालकांना स्थानिक पर्यवेक्षकीय प्राधिकाऱ्यांमार्फत नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

(४) महाराष्ट्र शुश्रूषा गृह नोंदणी अधिनियम, १९४९ मधील तरतूदीनुसार राज्यातील नोंदणीकृत खाजगी रुग्णालयांची तपासणी संबंधित स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकारी यांच्याकडून करण्यात येते. बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत सर्व नर्सिंग होमचे फायर ऑडीट अग्निशमन खात्यामार्फत नियमितपणे तपासले जाते.

अग्निशमन खात्यामार्फत ८२ नर्सिंग होम्स वर आग प्रतिबंधित आणि जीवसुरक्षा कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तसेच वैद्यकीय सुविधा तसेच आवश्यक सुविधा याबाबत महाराष्ट्र शुश्रूषा गृह नोंदणी अधिनियम, १९४९ अंतर्गत तरतूदीनुसार कारवाई करण्यात येते. रुग्णालयांमधील औषधे मान्यताप्राप्त असल्याबाबतची कारवाई औषधे आणि सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४९ अंतर्गत तरतूदीनुसार कारवाई करण्यात येते.

(५) बृहन्मुंबई मनपा हद्दीमध्ये १५७४ नर्सिंग होमची तपासणी केली असता १३७० खाजगी नर्सिंग होम हे नोंदणीकृत आढळले व १८८ नर्सिंग होम बंद आढळले. ३९ नर्सिंग होम हे अनोंदणीकृत आढळले असून त्यांच्यावर न्यायालयीन खटला दाखल करण्यात आला, त्यातील १७ नर्सिंग होम यांच्यावर न्यायालयामार्फत प्रत्येकी रु. १०,०००/- दंड ठोठावण्यात आला. तसेच कोल्हापूर जिल्हयात २ अनोंदणीकृत नर्सिंग होम आढळून आले त्यावर कारवाई सुरु असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ट आहे.

महाराष्ट्र शुश्रूषा गृह नोंदणी अधिनियम, १९४९ मधील तरतुदीनुसार संबंधित स्थानिक पर्यवेक्षीय प्राधिकारी यांचेकडून राज्यातील खाजगी रुग्णालयांची तपासणी करण्यात येते. त्यात त्रुटी आढळल्यास त्याबाबत रुग्णालय चालकांना नोटीस बजावण्यात येवून, सुधारणा करण्यासाठी एक महिन्याची नोटीस देण्यात येते. एक महिन्यानंतर फेरतपासणी करुन सुधारणा केल्याची खात्री करण्यात येते.

-----------------

## जालना जिल्ह्यातील उटवद-धांडेगाव-धांडेगाव तांडा- इजिमा-७० या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(९) * ५५४२ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत जालना जिल्ह्यातील उटवद-धांडेगाव-धांडेगाव तांडा-इजिमा-७० या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाच्या कामासाठी रु.४ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात येवून त्यासाठी निविदा मागवून ३ वेळा दिलेला कार्यारंभ आदेश रद्द करून पुन्हा निविदा काढण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे काम प्रगतीपथावर असताना त्याच रस्त्याच्या कामासाठी इतर योजनेतून (जिल्हा वार्षिक योजना, आमदार निधी व इतर) निधी खर्च करुन त्यात मोठया प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी कार्यकारी अभियंता, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, जालना या कार्यालयाची ना-हरकत घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन यातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) अंशत: खरे आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत पॅकेज क्रमांक JLN-७९ या पॅकेज अंतर्गत उटवद धांडेगाव ते इजिमा ७० ता. जि. जालना या ५.०० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या दर्जोन्नतीकरिता विभागाच्या दि.३०ऑक्टोबर,२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू.३७८.२७ लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदरहू कामाची प्रथम निविदा क्र.१५/२०१८-१९ दि.०३ जानेवारी, २०१९ रोजी प्रसिद्ध करून मे.आनंद कंन्सट्रक्शन,औरंगाबाद यांना दि.०८ मार्च, २०१९ रोजी प्रथम कार्यारंभ आदेश देण्यात आले. संबधित कंत्राटदार यांनी नालीकाम,माती भरावाचे काम व मुख्य फलकाचे काम केले होते.मात्र त्यांनी निविदा अटी व शर्तींचा भंग केल्याने निविदा रद्द करण्यात आली. तद्नंतर उर्वरीत कामाची द्वितीय निविदा क्र.०१/२०२१-२२ दि.०३ एप्रिल २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदरहू निविदेत श्री.श्रीकांत घुले पाटील हे L-१ देकारदार होते. मात्र त्यांनी निविदा अटी व शर्तीनुसार सुरक्षा अनामत रकमेचा भरणा विहित

मुदतीत ने केल्याने निविदा रद्द करण्याची कार्यवाही करण्यात आली. यास्तव प्रस्तूत कामाकरिता पुनश्च: तिसरी निविदा क्र.०५/२०२१-२२ दि.०८ फेबुवारी, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सदरहू निविदेत मे.वाय.पी.देशमुख ॲण्ड व्हि.के.गव्हाणे (JV) छ.संभाजीनगर हे L-१ देकारदार पात्र झाले असून त्यांना दिनांक १६ सप्टेंबर, २०२२ रोजी तृतीय कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

(२) व (३) स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांनी मागणी केल्याने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता जिल्हा विकास योजना लेखाशिर्षांतर्गत उटवद ते धांडेगाव पुलासह रस्ता सुधारणा करणेच्या अनुषंगाने ग्रामा ११७ साखळी क्र.००/०० ते १/०० व इजिमा-७० ते धांडेगाव तांडा ग्रामा-२३ साखळी क्र.१/५०० ते २/५०० या कामांमध्ये रस्त्याची सुधारणा करण्याकरिता अनुक्रमे रू.१५.०० लक्ष व र.१०.०० लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदरहू कामे ही मे.वाय.पी.देशमुख ॲण्ड व्हि.के.गव्हाणे (JV) छ.संभाजीनगर दि.१६ सप्टेंबर, २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी जिल्हा परिषद, जालना यांच्यामार्फत करण्यात आली आहेत. याकरिता कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, जालना या कार्यालयाची नाऱ्हरकत घेण्यात आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भाईंदर (जि. ठाणे) येथील गोल्डन नेस्ट नक्षत्र टॉवर इमारतीतील मैला साठवणूक टाकीची साफ-सफाई करताना झालेली दुर्घटना

**(१०) * १७८ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (जि.ठाणे) येथील गोल्डन नेस्ट नक्षत्र टाँवर इमारतीतीत मैला साठवणूक करण्याच्या टाकीची सफाई करताना श्री.महिंद्रा कमलाकर पोंडकर या कामगाराचा मृत्यू झाला तर श्री.गणेश उत्तम आवटे गंभीर अवस्थेत असताना त्यास दिनांक ०७ जानेवारी, २०२४ रोजी वा सुमारास जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेची नवघर पोलीस ठाण्याने दखल घेऊन चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधित विकासकाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, उक्त प्रकरणी मृत व जखमी झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देऊन अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) खरे आहे,

गोल्डन नेस्ट नक्षत्र टॉवर को.ऑ.हौ.सो., भाईंदर (पू), ता.जि. ठाणे या निवासी इमारतीतील मैला साठवणूक करण्याच्या टाकीची साफ-सफाई करण्याचे काम सोसायटीने श्री. मुकेश बबन पाटील या ठेकेदारास तोंडी करारान्वये दिले होते. ठेकेदाराने कामासाठी नेमलेल्या कामगारांपैकी श्री. महेंद्र कमलाकर पौंडकर हे टाकीमध्ये उतरुन सफाई करत असतांना टाकीत गॅस निर्माण झाला व हा गॅस श्री. महेंद्र कमलाकर पौंडकर यांच्या नाकातोंडातून शरीरात गेल्याने ते टाकीतच बेशुध्द होवून खाली पडले. त्यांना वर काढण्याकरीता श्री. गणेश आवटे टाकीमध्ये उतरले असता, त्यांच्या ही शरीरात गॅस गेल्याने बेशुध्द झाले. या दोघांना बाहेर काढून उपचारासाठी इस्पितळात दाखल केले असता डॉक्टरांनी श्री. महेंद्र कमलाकर पौंडकर वय ३७ वर्षे, रा. मिरारोड (पू) हे मयत झाल्याचे घोषित केले. तर श्री. आवटे यांना उपचारानंतर घरी पाठविण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणी ठेकेदार व सोसायटीचे पदाधिकारी यांचेविरुध्द भा.न्या.सं. कलम १०६ (१), ३ (५) सह हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या सेवा योजनेस प्रतिबंध आणि त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३ कलम ७,८,९ प्रमाणे दि. ०७.०१.२०२५ रोजी गु.र.नं. १७/२०२५ नोंदविण्यात आलेला आहे.

(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. १२/१२/२०१९ च्या शासन निर्णयानुसार कामगाराचे वारसास तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत सोसायटीचे पदाधिकारी यांना मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून नोटीसीद्वारे कळविण्यात आलेले आहे.तसेंच श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ नुसार मयत कामगाराचे वारसास नुकसान भरपाई मिळावी याकरीता कामगार आयुक्त कार्यालयाकडून मा. नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांना दि. २४/०२/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आलेले असून ठेकेदारास किमान वेतन अधिनियम, १९४८ व वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अंर्तगत निरीक्षण शेरे पारीत केलेले असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

मल मूत्राच्या टाक्यांची सफाई करण्याची बाब स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यकक्षेत येते. तथापि अशा दुर्घटनेची तात्काळ दखल घेऊन संबंधिताना नुकसान भरपाई मिळण्यासाठी कामगार विभागाकडून तात्काळ कार्यवाही करण्यात येते

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात बोगस डॉक्टरांना शोधण्यासाठी मोहीम राबविण्यासह प्रतिबंधात्मक कारवाई करणेबाबत**

**(११) * ८१७ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी बोगस डॉक्टरांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मोहिम राबवून बोगस डॉक्टर शोधण्याबाबतची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, बोगस डॉक्टरांकडून घेतलेल्या उपचारामुळे नागरिकांचे जीव धोक्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस डॉक्टरांवर तातडीने आळा घालण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

(२) बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर कार्यवाही करण्याकरिता जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय तसेच नगर पालिका व महानगरपालिका स्तरावर अनुक्रमे जिल्हाधिकारी, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी व मनपा आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५/०९/१९९१ रोजीच्या शासन निर्णयान्वये शोध समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच, बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरिता दि.०७.०२.२००० रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समिती गठीत करण्यात आलेली आहे. बोगस वैद्यकीय व्यावसायिकांविरूद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ च्या कलम ३३, ३३(अ) व ३८ नुसार कारवाई

करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे व सूचना दि.१९.०८.२००० रोजीच्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. विभागाच्या सदर उपाय योजनेस अनुसरून बोगस वैद्यकीय व्यावसायिकांचा आढावा घेऊन संबंधित न्यायालयात खटले दाखल करण्याची कारवाई पोलिस यंत्रणेमार्फत वेळोवेळी करण्यात येते. सदर कार्यवाहीत बोगस डॉक्टरांवर महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ चे कलम ३३, ३६ व भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४१९ व ४२० अंतर्गत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करून मा. न्यायालयामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येते.
(३) व (४) शासनाद्वारे गठीत समित्यांकडून पोलिस यंत्रणेच्या मार्फत बोगस डॉक्टरांवर आळा घालण्याच्या दृष्टीने वेळोवेळी कार्यवाही करण्याचे शासनाचे स्थायी आदेश आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड येथील जिल्हा रुग्णालयात कोविड काळात झालेली आर्थिक अनियमितता

**(१२)** * **२०४५ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील जिल्हा रुग्णालयात कोविडमध्ये रेमडीसीवीर इंजक्शन वितरण, कंत्राटी कर्मचारी भरती व शासकीय निधीमध्ये मोठया प्रमाणात आर्थिक अनियमितता झाल्या प्रकरणी उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर व जिल्हा परिषद, बीड येथील लेखा व वित्त विभागाच्या पथकाद्वारे चौकशी करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशी पथकाने या प्रकरणी गंभीर आक्षेप नोंदवित संबंधित दोषींवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी बीड येथील सध्याचे व तत्कालिन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात व डॉ. सुर्यकांत साबळे यांच्यावर कारवाई करण्यासाठी दोषारोप पत्राबाबतची ज्ञापने निर्गमित करुनही अद्याप त्यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डॉ.अशोक थोरात यांना बीड येथे जिल्हा शल्यचिकित्सक पदावर नियमबाह्यरित्या नियुक्ती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणी चौकशी करून कारवाई करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.आरोग्य मंत्री यांचेकडे दिनांक २३ डिसेंबर,२०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) होय.
(२) होय.
(३) हे खरे नाही.

साहित्य सामग्री, औषधे इत्यादी खरेदीतील आर्थिक अनियमिततेबाबत सकृतदर्शनी दोषी आढळलेले डॉ.अशोक थोरात, तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक व डॉ.सुर्यकांत साबळे, तत्कालिन जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बीड यांच्यासह इतर ९ अधिकारी कर्मचारी यांचे विरुध्द शासन आदेश क्र.विभाचौ-१३२३/प्र.क्र.१८/सेवा-४अ, दि.१२/०५/२०२३ रोजीच्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरु करुन त्यांना दोषारोपपत्र (जोडपत्र १ ते ४) बजावण्यात आली आहेत. सदर प्रकरणात वरील अपचाऱ्यांची निवेदने प्राप्त झाल्यानंतर अधिक चौकशीची आवश्यकता दिसून आल्याने सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याकरीता शासन आदेश दि.५/०९/२०२४ अन्वये प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, छ.संभाजीनगर यांची चौकशी

अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. चौकशी अधिकारी यांचा अहवाल अद्याप शासनास अप्राप्त आहे. सबब, संबंधितांवर विभागीय चौकशी सुरु आहे.
(४) हे खरे नाही.
(५) होय.
(६) प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, छ.संभाजीनगर यांचा चौकशीचा अंतिम अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

-----------------

**विदर्भातील सहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयांना निधी पुरविणेबाबत**

**(१३) * ३९४३ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील सहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयांना औषधांसह वैद्यकीय उपकरणे पोहचलीच नसल्यामुळे तात्पुरत्या उपचारासाठी (मलमपट्टीसाठी) मिळालेल्या निधीवरच लाखो रुग्णांवर औषधोपचार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, विदर्भातील या सहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या रुग्णालयांना तातडीने औषधे, वैद्यकीय उपकरणे व निधी पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही.
(२) सन २०२४-२५ या चालू वित्तीय वर्षात संचालनालयाच्या अधिनस्त विदर्भातील ६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यांच्याशी संलग्नित रुग्णालयांकरिता औषधे, सर्जिकल साहित्य व तत्सम बाबींसाठी एकूण रु.३२.४५ कोटी इतके अनुदान अर्थसंकल्पीत करण्यात आलेले आहे. तसेच, रु.१२.८९ कोटी एवढी पुरवणी मागणी मंजुर झाली आहे. याव्यतिरिक्त या ६ संस्थांना जिल्हा वार्षिक योजना, स्वीय प्रपंची खाते, महात्मा फुले जन आरोग्य योजना यामधून सुध्दा औषधे व सर्जिकल बाबीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात "पिंक (गुलाबी) ई-रिक्षा" योजना लागू करणेबाबत**

**(१४) * २०८६ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गरजू महिलांना रोजगारासाठी "पिंक (गुलाबी) ई-रिक्षा" ही योजना दिनांक ८ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेत राज्यातील केवळ १७ शहरांचा समावेश असून राज्यात अन्यत्र ही योजना लागू नसल्याने तेथील गरजू महिला या योजनेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संपूर्ण राज्यात ही योजना लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे. सर्वप्रथम दि.०८/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील प्रमुख १७ शहरात सदर योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तद्नंतर दि.२५/०९/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुंबई महानगर प्रदेश अंतर्गत ७ शहरे वगळून सदर योजना राज्यातील १० शहरात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून १०,००० लाभार्थ्यांची संख्या निश्चित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यात प्राथमिक शिक्षकांच्या नियमबाह्य नियुक्त्या केल्याबाबत**

**(१५) * ११२५ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विभागीय आयुक्तांच्या अधिकाराचा गैरवापर करत प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्री. प्रशांत आरबाळे यांनी अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यात २१ प्राथमिक शिक्षकांच्या नियमबाह्य प्रतिनियुक्त्या केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी होणारी चौकशी टाळण्यासाठी उक्त अधिकाऱ्याने गटविकास अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय २१ पैकी १२ प्राथमिक शिक्षकांच्या नियमबाह्य प्रतिनियुक्त्या रद्द केल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणी चौकशी करण्यासाठी शिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित त्रिसदस्यीय चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत अक्कलकोट तालुक्यातील ज्या शाळांचा पट अत्यल्प आहे किंवा शिक्षक अतिरिक्त आहेत, अशा शाळेतील २१ शिक्षकांचे जास्त पटसंख्या व शिक्षकाची गरज असलेल्या शाळेवर विद्यार्थ्यींचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी संचमान्यता अंतिम होईपर्यंत गट विकास अधिकारी यांच्या मान्यतेने तात्पुरते समायोजन करण्यात आले होते.

(३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीस अनुसरुन शिक्षणाधिकारी (योजना) यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सोलापूर यांचेकडे दि.१६.१.२०२५ रोजी चौकशी अहवाल सादर केला आहे. त्यानुसार श्री. प्रशांत आरबाळे, प्रभारी गट शिक्षणाधिकारी, अक्कलकोट यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून त्यांचा खुलासा प्राप्त होताच नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यात टँकरने पाणीपुरवठा करणाऱ्या एजन्सीला जादा रक्कम अदा केल्याबाबत**

**(१६) * १४१९ श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यात सन २०१९ ते २०२३ या कालावधीत पाणी टंचाईची उपाययोजना म्हणून ग्रामीण भागात टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामी सेनगाव पंचायत समिती लेखा विभागातील कर्मचाऱ्यांनी टँकरने पाणी पुरवठा करणाऱ्या एजन्सीला नियमबाह्यरित्या देयके मंजूर करुन संबंधित एजन्सीला जादा रक्कम अदा केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी संबंधित सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे काय,
(४)असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी करुन जादा रकमेची वसुली करणेसह दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, संबंधीत कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) चौकशी करून रु.२९४७७०४/- इतक्या जादा रक्कमेची वसुली करण्यात आली असून संबंधित दोषी कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील मे.नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लिमिटेड (एनआरसी) कंपनीतील कामगारांची थकबाकी अदा करणेबाबत**

**(१७) * ४८१८ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) जवळील आंबिवली मोहने येथील मे.नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लिमिटेड (एनआरसी) कंपनीमध्ये काही वर्षांपूर्वी टाळेबंदी लागू केल्याने सुमारे ४५०० कामगार बेकार झाले असून अद्याप त्यांची प्रॉव्हिडंट फंड, पेन्शन, ग्रॅच्युईटी इत्यादी मिळून जवळजवळ रु.१३४० कोटी एवढी थकबाकी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००९ मध्ये बंद पडलेल्या एनआरसी कंपनीमधील कर्मचाऱ्यांची देणी अद्याप प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन कामगारांची थकीत रु.१३४० कोटींएवढी थकबाकी अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मे.नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लिमिटेड (एनआरसी) या कंपनीमध्ये दि.१५/११/२००९ पासून टाळेबंदी सुरू झाली असून सदर कंपनीस वित्त पुरवठा करणाऱ्या पंजाब नॅशनल बँकेने त्यांची थकीत रक्कम मिळावी म्हणून मा.राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे (NCLT) दाखल केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने मा.न्यायाधिकरणाने Resolution Professional यांची नियुक्त केलेली आहे.

मा.न्यायाधिकरणाने दि.१३/०३/२०२० रोजीच्या आदेशान्वये मे.अदानी प्रॉपर्टीज लिमिटेड यांनी दाखल केलेला Resolution Plan मंजूर केलेला आहे. सदर योजनेनुसार न्यायाधिकरणाने कामगारांची देणी देण्याकरीता रु.३२.१६ कोटी मंजूर केलेले आहेत. याशिवाय मे.अदानी प्रॉपर्टीज प्रा. लिमिटेड व एनआरसी मजदूर संघ यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार अतिरिक्त रु.६८ कोटी अटी व शर्थीसह विशेष लाभ योजना म्हणून कामगारांची

देणी देण्याची तरतूद केलेली आहे. अशाप्रकारे कामगारांची कायदेशीर देणी देण्याकरीता एकूण रु.१०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. माहे फेब्रुवारी,२०२५ अखेर एकूण ११५७ कामगारांना रु.२७,०५,७७,०६३/- इतक्या रकमेचे धनादेश देण्यात आलेले असून उर्वरीत ३२५४ कामगार/कर्मचाऱ्यांना धनादेश देण्याची कार्यवाही सी.आय.आर.पी. (Corporate Insolvency Resolution Process) कडून करण्यात येत आहे.

प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी कार्यालय, ठाणे यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार मे.एनआरसी लि. आस्थापनेस भविष्य निर्वाह निधी योजनेत सूट दिलेली असून सदर आस्थापनेद्वारे भविष्य निर्वाह निधी ट्रस्ट स्थापन करून कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी सांभाळला जातो. सदर ट्रस्टने SBI कडे विशेष ठेव योजनेअंतर्गत जमा केलेली रू.३४,७०,६०,८४९/- ही रक्कम SBI ने दि.२२/०७/२०२४ रोजी केंद्रीय बोर्ड ऑफ ट्रस्टीज, EPFO यांच्याकडे हस्तांतरीत केली आहे. तथापि, सध्याच्या व्यवस्थापनाने सदस्यानुसार व खात्यानुसार पूर्व जमा यादी (Past accumulation Statement) सादर केलेली नसल्यामुळे तसेच व्यवस्थापनाद्वारे ईसीआर (इलेक्ट्रॉनिक चलन कम रिटर्न) दाखल करणे आवश्यक असल्याने सदर जमा रक्कम कर्मचाऱ्यांच्या खाती वर्ग करण्यात आलेली नाही.

(३) कामगारांची कायदेशीर देणी अदा करणे, ही बाब मा.राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांच्याकडे न्यायप्रविष्ठ असून त्यांच्या आदेशान्वये सी.आय.आर.पी. (Corporate Insolvency Resolution Process) कडून कामगारांची देणी अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याने शासनाकडून कार्यवाही अपेक्षित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि. रायगड) येथील तिर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी उप जिल्हा रूग्णालयातील आरोग्य विषयक समस्यांचे निराकरण करणेबाबत

**(१८) * १६४६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील तिर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी उप जिल्हा रूग्णालयात दैनंदिन उपचारासाठी लागणाऱ्या आवश्यक औषधांचे मागणीपत्र शासनाकडे जवळपास आठ महिन्यांपूर्वी सादर करुनसुध्दा औषधे उपलब्ध होत नसल्यामुळे रूग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रूग्णालयातील स्वच्छतेच्या कामाकडे ठेकेदाराने केलेल्या दुर्लक्षामुळे पसरणाऱ्या दुर्गंधीमुळे डॉक्टर, कर्मचारी तसेच रूग्णांच्या नातेवाईकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याने या रूग्णालयाच्या स्वच्छतेसाठी आवश्यक ती उपाययोजना व निधीची मागणी शासनाकडे अनेक महिन्यांपूर्वी करूनसुद्धा शासनाकडून त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने सदर रूग्णालयात दैनंदिन उपचारासाठी लागणारा आवश्यक औषध पुरवठा उपलब्ध करणे तसेच स्वच्छतेसाठी आवश्यक ती उपाययोजना व निधी उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत, राज्यस्तरावरून महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत राज्याच्या एकत्रित वार्षिक मागणीनुसार औषधी व साहित्य सामुग्रीचा पुरवठा करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच, जिल्हास्तरावर, जिल्हा वार्षिक योजना निधी, स्थानिक निधी व इतर माध्यमांमार्फत प्राप्त निधीतून स्थानिक पातळीवर अत्यावश्यक औषधे

खरेदी करून उपलब्ध करुन देण्यात येतात. वैद्यकीय अधिक्षक,उपजिल्हा रुग्णालय, पनवेल यांच्या मागणीनुसार जिल्हा रुग्णालय अलीबाग येथील उपलब्ध औषध पुरवठा नियमित करण्यात येतो.
(२) व (३) पनवेल उपजिल्हा रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंन्टर येथील रुग्णालयातील स्वच्छतेचे कंत्राटी स्वरूपामधील काम मे. न्यू ज्याला सिक्युरिटी फोर्स, नागपूर यांना देण्यात आलेले आहे. माहे मार्च, २०२४ व माहे ऑगस्ट, २०२४ या कालावधीत ठेकेदारामार्फत हे स्वच्छतेचे काम अपेक्षित दर्जाचे न झाल्याने करारामधील अटी व शर्तीनुसार संबंधित ठेकेदारास नोटीस बजावून दंड आकारण्यात आला आहे. तसेच कामाचा दर्जा सुयोग्य राखण्यासाठी त्यास वेळोवेळी ताकीद देण्यात आलेली आहे. ठेकेदारास दंड करण्यात आलेल्या कालावधीमध्ये रुग्णालयीन स्वच्छतेचे काम रुग्णालयात कार्यरत असलेल्या अन्य स्वच्छता सेवा कर्मचारी यांचेकडून करुन घेण्यात आले आहे. सद्य:स्थितीत, रुग्णालयीन स्वच्छता अपेक्षित दर्जाप्रमाणे होत असून ठेकेदाराच्या कामावर रुग्णालय प्रशासनाव्दारे काटेकोर पर्यवेक्षण करण्यात येत आहे.
(४) रुग्णालयाच्या स्वच्छतेसाठी आवश्यक तो निधी वेळोवळी देण्यात येत असून संबंधित ठेकेदारास तो निधी करारातील अटी व शर्तीच्या अधिन राहून अदा करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत माहे ऑगस्ट, २०२४ पासूनची संबंधित ठेकेदाराची देयके अपूऱ्या अनुदानामुळे प्रलंबित आहेत. याबाबत कंत्राटी सेवेची देयके अदा करण्याकरीता पुरवणी मागणी द्वारे निधी मंजूर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण मार्फत पुरवठा होणारी व जिल्हा वार्षिक योजनांतर्गत तसेच स्थानिक खरेदीच्या अनुदानातून औषधे उपलब्ध करुन अधिपत्याखालील आरोग्य संस्थाना त्यांच्या मागणीनुसार पुरवठा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिवनाकवाडी ( ता. शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील ग्रामदेवतेच्या यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या महाप्रसादामधून विषबाधा झाल्याबाबत

**(१९) * ५४७३ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवनाकवाडी ( ता. शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील ग्रामदैवत श्री. कल्याणताई माता देवीच्या यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या महाप्रसादाच्या जेवणातून विषबाधा होऊन सुमारे सातशे व्यक्तींना इचलकरंजी येथील इंदिरा गांधी सामान्य रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रासह खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास , दुसऱ्या दिवशीही पुन्हा शंभर ते दीडशे व्यक्तींना दाखल करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करणेसह अशा प्रकारांना आळा घालणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शिवनाकवाडी, ता.शिरोळ या गावी दिनांक ०५/०२/२०२५ रोजी कल्याणताई देवी यात्रा महाप्रसादाचे जेवणातील अन्नपदार्थामधून अन्नविषबाधा झाली असण्याचा प्राथमिक अंदाज असून यामध्ये एकूण ६५१ रुग्णांवर उपचार करण्यात आले असून कोणतीही जीवितहानी झाली नाही.

(२) हे खरे आहे.

यातील प्रामुख्याने रुग्ण हे दिनांक ०५/०२/२०२५ रोजी आढळून आले व दुसऱ्या दिवशी २१२ रुग्णांवर उपचार करण्यात आले. दिनांक ०५/०२/२०२५ ते दिनांक ०९/०२/२०२५ या कालावधीमध्ये एकूण ६५१ रुग्णांवर उपचार करण्यात आले.

(३) दिनांक ०५/०२/२०२५ रोजी दुपारच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचेकडून उपरोक्त घटनेची माहिती प्राप्त होताच अन्न व औषध प्रशासनाच्या कोल्हापूर कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवून महाप्रसादामध्ये बनविण्यात आलेली खीर व अन्नपदार्थ बनविण्यासाठी तसेच भाविकांना पिण्यासाठी वापरलेल्या पाण्याचे एकूण ३ नमुने असे एकूण ४ सर्वेक्षण नमुने विश्लेषणासाठी घेतले.

सदर नमुन्यांपैकी खीर या अन्न नमुन्यांचा अहवाल प्राप्त झाला असून सदर नमुना प्रमाणित घोषित झाला आहे व उर्वरित पाण्याच्या ३ नमुन्यांचे अहवाल अद्याप प्रलंबित आहेत.

अन्न व औषध प्रशासनाच्या कोल्हापूर कार्यालयामार्फत दि. १३/०२/२०२५ रोजी शिरोळ तालुक्यात तहसिलदार, गटविकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांचेसमवेत शिरोळ तालुक्यातील सर्व सरपंच, पोलीस पाटील, यात्रा कमिटी अध्यक्ष, ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी यांना यात्रेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना व घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन करून मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वृत्तपत्रात देखील यात्रे दरम्यान अन्न विषबाधा टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शक सूचना अन्न व औषध प्रशासन, कोल्हापूर यांचेमार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करणेबाबत**

**(२०) * ३५४९ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.शिवाजी कर्डिले (राहुरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यवस्थ रुग्णाला रुग्णालयात शिधापत्रिका, तहसील कार्यालयातील रहिवाशी दाखला, आधारकार्ड इत्यादी कागदपत्रे मागितली जात असल्यामुळे अनेक रुग्णांना या योजनेपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेत तालुकास्तरावरील रुग्णालयांचा समावेश करण्यात आला नसणे, यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया व कर्करोगासारख्या दुर्धर आजाराच्या निदान करण्याच्या चाचण्यांचा उदा.पेटस्कॅन यासारख्या खर्चिक चाचण्यांचा समावेश नसणे यामुळे गरीब आणि सामान्य रुग्ण वैद्यकीयदृष्टया तसेच आर्थिकदृष्टया अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेच्या पॅनलवर असणाऱ्या विविध रुग्णालयामार्फत रुग्णांच्या नातेवाईकांकडून या योजनेअंतर्गत ठराविक रक्कमच मिळत असल्याने या योजनेचा लाभ न घेता नियमित रुग्ण म्हणून रुग्णालयात दाखल करुन आर्थिक लूट करण्यात येते अशा तक्रारी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून प्राप्त झाल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील सर्व नागरिकांना या योजनेचा लाभ मिळावा याकरीता शासनाने कागदपत्राच्या जाचक अटी रद्द करणे, तालुकास्तरावरील रुग्णालयांचाही समावेश करणे तसेच यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रियेचा व कर्करोगासारख्या दुर्धर आजाराच्या निदान करण्याच्या चाचण्यांचा समावेश करणे तसेच पॅनलवर असणाऱ्या रुग्णालयामार्फत रुग्णांची आर्थिक लूट करण्याऱ्या रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर:** (१) शासन निर्णय क्र. मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दि.२८/०७/२०२३ नुसार आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या योजनांचे विस्तारीकरण करण्यात आले आहे. दि. २८/७/२०२३ च्या शासन निर्णयानुसार महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना ही राज्यातील सर्व नागरिकांना लागू करण्यात आली आहे. ही विस्तारित योजना दि. १ जुलै, २०२४ पासून राज्यात राबविण्यात येत आहे.
(२) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. २८/७/२०२३ च्या शासननिर्णयानुसार योजनेंतर्गत रूग्णांच्या नोंदणीकरिता केवळ आयुष्मान कार्ड किंवा शिधापत्रिका, शिधापत्रिका नसल्यास अधिवास प्रमाणपत्र आणि आधार कार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. सदरची किमान कागदपत्रे प्राप्त झाल्यावर कोणत्याही रुग्णास योजनेच्या लाभापासून वंचित ठेवले जात नाही.

आपत्कालीन परिस्थितीत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे उपलब्ध नसल्यास ETI (Emergency Telephonic Intimation) ची सुविधा आहे. या परिस्थितीत कागदपत्रांची पूर्तता करण्यास ५ दिवसांचा अवधी उपलब्ध आहे.
(३) एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत तालुकास्तरावर रूग्णालये अंगीकृत आहेत.

एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत यकृत प्रत्यारोपणाचे उपचार समाविष्ट नाहीत.
योजनेत कर्करोगासारख्या दुर्धर आजारासांठीच्या निदान करण्याच्या चाचण्यांचा/तपासण्यांचा समावेश नाही. तथापि कर्करोगग्रस्त रूग्णांना उपचार पश्चात पुरविण्यात येत असलेल्या पाठपुरावा सेवांमध्ये (Follow-up) चाचण्यांचा समावेश आहे.
(४) योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयात दाखल होण्यापासून ते रुग्ण घरी जाईपर्यंत होणाऱ्या सर्व खर्चाचा (उदा. डॉक्टरांचे शुल्क, औषधोपचार, जेवण, खाटांचे शुल्क व एक वेळच्या परतीचे प्रवासभाडे) समावेश आहे. सर्व सेवा मिळाल्या नसल्यास रुग्णांना योजनेच्या टोल फ्री क्रमांकावर तक्रार दाखल करता येते व सदर तक्रारींवर योग्य ती कार्यवाही करण्यात येते.
(५) उपप्रश्न २ मध्ये नमूद केल्यानुसार रुग्णांची किमान कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर रुग्णांवर उपचार करण्यात येतात किंवा तातडीची मान्यता (ETI) घेऊन तात्काळ उपचार करता येतात.
सध्या असलेल्या अंगीकृत रुग्णालयांच्या संख्येत वाढ करून अतिरिक्त २३०० पेक्षा जास्त रुग्णालये अंगीकृत करण्याची प्रक्रिया सुरु आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी रुग्णांना तालुकास्तरावर नजिकच्या रूग्णालयात सुविधा उपलब्ध होतील.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पूर्णा (जि.परभणी) येथील पंचायत समिती अंतर्गत पेन्शनमध्ये झालेला आर्थिक अपहार

**(२१) * ३५८८ श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णा (जि.परभणी) येथील पंचायत समिती अंतर्गत पेन्शनमध्ये कोटयवधी रुपयांचा अपहार व गैरव्यवहार झाल्याप्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी, परभणी यांनी चौकशी समिती स्थापन केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून झालेल्या नुकसानीची वसूली करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) होय.

(२) दिनांक १२/१२/२०२३ अन्वये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बा.क.) यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली. सदर चौकशी समितीच्या अहवालावरून माहे ऑक्टोबर, २०२१ ते माहे मे, २०२३ या कालावधीत रु.१,८३,७७,८४४/- एवढया शासकीय रक्कमेचा अपहार तसेच रू.२,४२,८२,३०१/- एवढ्या रक्कमेचा संशयास्पद अपहार झाल्याचे तसेच लेखा विभागात वित्तीय अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणाशी संबंधीत श्रीम. एस. के. वानखेडे, तत्कालीन प्रभारी गट विकास अधिकारी, श्री.जे व्ही. मोडके, तत्कालीन प्रभारी गट विकास अधिकारी पंचायत समिती पूर्णा व इतर अशा एकूण ९ जणांविरुध्द पोलीस स्टेशन पूर्णा येथे दिनांक ०७/०१/२०२५ रोजी गुर नं.०४/२०२५, कलम ४२०, ४०९, ४६७, ४६८,४७१ व ३४ भा.दं.वि. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाशी संबंधित श्री. एस.के. पाठक, सहाय्यक लेखाधिकारी व श्री.एम.बि. भिसे, वरिष्ठ सहाय्यक (लेखा), पंचायत समिती पूर्णा, यांना दिनांक ०८/०१/२०२५ रोजी निलंबित केले असून त्यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ मधील तरतुदी नुसार विभागीय चौकशीसुद्धा सुरु करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणी अपहाराची रक्कम व्याजासह वसूल करण्याबाबत जिल्हा परिषद, परभणीकडून दि.१८.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांना निर्देशित करण्यात आले असून वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बाल संगोपन योजनेंतर्गत मिळणारे अनुदान तातडीने वितरित करणेबाबत

**(२२) * ५६४३ श्री.अमोल जावळे (रावेर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेंतर्गत शून्य ते अठरा वर्षापर्यंतच्या अनाथ बालकांसाठी शिक्षण व बालसंगोपनासाठी दरमहा २,२५०/- रूपये तर कोरोना संसर्गाच्या काळात आई किंवा वडील किंवा दोन्ही पालक गमावलेल्या एकल किंवा अनाथ बालकांना केंद्र पुरस्कृत योजनेतून दरमहा ४,०००/- रूपये अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात या योजनेंतर्गत सुमारे एक लाख बालके लाभार्थी असून गेल्या दोन वर्षांपासून देण्यात येणारे अनुदान मोठया प्रमाणात प्रलंबित असून काही ठिकाणी रक्कम थेट बँकेत जमा होण्यास विलंब होत

असल्याने अनुदानाअभावी निराधार बालकांना शिक्षणासोबत इतर खर्च भागविण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिला व बालविकास आयुक्तांच्या कार्यालयाकडे कोटयवधी रूपयांचे अनुदान जमा असूनही सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान दीर्घ कालावधीनंतरही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदान तातडीने वितरित करण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर अनुदान तातडीने वितरित करण्याबाबत तसेच विलंबास जबाबदार असणाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे, काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

राज्य शासनाच्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेंतर्गत १,००,२३६ लाभार्थ्यांना रू.१०१.४६ कोटी इतका निधी डीबीटी द्वारे वितरीत करण्यात आलेला आहे तर केंद्र पुरस्कृत मिशन वात्सल्य योजनेच्या स्पॉन्सरशिप या उपयोजनेंतर्गत २७,४३८ लाभार्थ्यांना रू. १२९.५९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच या योजनेंतर्गत उर्वरीत निधी वित्त विभागाच्या मान्यतेने वितरीत करावयाची कार्यवाही सुरू आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सदर योजनांतर्गत वित्त विभागाच्या मान्यतेने निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरू असून वित्त विभागाने उपलब्ध करून दिलेला सर्व निधी वितरीत केलेला असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील "अमुदान" या केमिकल कारखान्यात बॉयलरचे स्फोट झाल्याबाबत**

**(२३) * ४९७४ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील फेज दोनमधील औद्योगिक वसाहतीतील "अमुदान" या थिनर बनविणाऱ्या केमिकल कारखान्यात दिनांक २३ मे, २०२४ वा त्यासुमारास रोजी झालेल्या बॉयलरच्या स्फोटात १६ जणांचा मृत्यू व १०० हून अधिकजण जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या एमआयडीसीमध्ये यापूर्वी रोबेस या कारखान्यात शक्तीशाली स्फोटात १२ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपन्या डोंबिवलीतील नागरी वस्तीतून स्थलांतरित करण्याची मागणी वारंवार होत असूनही त्याची अंमलबजावणी अद्याप करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृत व जखमींना आर्थिक मदत देणे, धोकादायक कंपन्यांचे नागरी वस्तींतून स्थलांतरण करणेबाबत तसेच संबंधित कंपन्यांच्या मालकांविरुध्द सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करुन कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

अमुदान केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, एमआयडीसी फेज-२, डोंबिवली या कारखान्यात दिनांक २३ मे, २०२४ रोजी झालेल्या स्फोटात १३ कामगारांचा मृत्यू झाला आणि ६७ व्यक्ती जखमी झाले आहे.

(२) मे. प्रोबेस इंटरप्रायझेस, एमआयडीसी फेज-२, डोंबिवली या कारखान्यात दिनांक २६ मे,२०१६ रोजी वेल्डिंगच्या ठिणगीमुळे तेथे असलेल्या ज्वलनशील रसायनांच्या वाफांनी पेट घेतला व आग लागली. यामध्ये १२ व्यक्ती मृत व २१५ व्यक्ती जखमी झाले होते.

(३) डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक, धोकादायक व अति धोकादायक कारखान्यांचे उत्पादन स्थालांतरीत करणे तसेच विनापरवाना कारखाने बंद करण्यासंदर्भात दिनांक २८/०५/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली कृती आराखडा (Action Plan) तयार करण्यासाठी समिती स्थापना करण्यात आली आहे.

कारखाने स्थलांतर करण्याबाबत सर्वेक्षण करण्याकरीता सह मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या नियंत्रणाखाली क्षेत्रीय सर्वेक्षण समिती गठीत करण्यात आली आहे.

क्षेत्रीय सर्वेक्षण समितीने औद्योगिक क्षेत्रातील रहिवाशी क्षेत्रापासून ५० मी. अंतरापर्यंत,१०० मी. अंतरापर्यंत व १०० मी. अंतरापुढे असलेल्या उद्योगांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. सदर सर्वेक्षणदरम्यान धोकादायक व अतिधोकादायक इत्यादी अशी याबाबतचा परिपूर्ण अहवाल दि. २१/०८/२०२४ रोजी शासनास सादर करण्यात आलेला असून याबाबत शासन स्तरावर निर्णय विचाराधीन आहे.

काही भूखंडधारकांनी रासायनिक उत्पादनांऐवजी माहिती आणि तंत्रज्ञान या वापराकरीता महामंडळाकडून परवानगी घेतलेली असून त्यांनी भूखंडावरील रासायनिक उद्योग बंद केले आहेत.

(४) मे. अमुदान केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, एमआयडीसी फेज-२, डोंबिवली या कारखान्यातील १३ मृत कामगारांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) अर्थसहाय्य मंजूर झाले आहे. १३ मृत व्यक्तींपैकी १२ मृत व्यक्तीच्या वारसांना मदत देणेत आलेली आहे. उर्वरित १ मृत व्यक्तीचे मदत देणे प्रलंबित आहे.

तसेच, एकूण १३ मृत कामगारांपैकी १२ कामगार हे ईएसआयसी अंतर्गत विमाधारक आहेत. दोन मृत कामगारांच्या वारसांना प्रतिदिन पेंशन मंजूर झाली आहे. तसेच उर्वरित १० मृत कामगारांच्या वारसांना ईएसआयसीमार्फत नुकसानभरपाई मिळणेबाबतची कार्यवाही चालू आहे. उर्वरीत एक मृत कामगाराचे वेतन राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नमूद वेतन मर्यादेपेक्षा अधिक असल्याने त्यांच्या वारसास नुकसानभरपाई मिळणेबाबत नुकसानभरपाई आयुक्त यांना कळविले आहे.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत कारखान्याचे संचालकांविरुध्द मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांच्या न्यायालयात एकूण ९ खटले दाखले करण्यात आले आहेत.

पोलीस विभागाकडून सदर अपघाताची चौकशी करण्यात आली असून या प्रकरणी भादंवि कलम ३०४ अन्वये कारखान्याचे संचालक श्री. मलय मेहता व सौ.स्नेहा मेहता यांचेविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे.

कारखान्याचे संचालक श्री. मलय मेहता यांना दिनांक २४/०५/२०२४ अटक करण्यांत आली होती. तसेच सौ.स्नेहा मेहता यांना दिनांक २८/०५/२०२४ रोजी अटक करण्यात आली होती. सदर आरोपी श्री. मलय मेहता व सौ.स्नेहा मेहता दिनांक ३१/०५/२०२४ रोजी न्यायालयीन कोठडी मिळाली आहे. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कल्याण यांनी दि. १५/०६/२०२४ रोजी जामीन मंजूर केला आहे. सदर दोन्ही आरोपी यांचे विरुध्द न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, ३ रे न्यायालय, कल्याण येथे दि. १७/०९/२०२४ रोजी दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली येथील बांधकाम कामगार कल्याण योजनेंर्गत झालेली अनियमितता

**(२४) * ५६५० श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात बांधकाम कामगार कल्याण योजनेंर्गत नोंदणी, नुतनीकरण क्लेम, साहित्य वाटप आदी कामांमध्ये मोठया प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंतर्गत अनेक अपात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून पात्र लाभार्थी यापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, या योजनेत अनियमितता झाल्याने गत पाच वर्षांतील लाभार्थ्यांच्या यादीची सखोल चौकशी करण्याबाबत नागरिकांनी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री व मा.कामगार मंत्री यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मागणी करुन आंदोलनाचा इशारा दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देणेसह यातील दोषींवर कारवाई करणेबाबत कोणेती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे खरे नाही.

हिंगोली जिल्हयात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत आतापर्यंत ऑनलाईन पध्दतीने एकूण १,४८,५२५ बांधकाम कामगारांची नोंदणी व ४८,५८४ इतक्या कामगारांचे नुतनीकरण करण्यात आले असून मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत एकूण ४२,८०० बांधकाम कामगारांना लाभ देण्यात आला आहे. तसेच एकूण ८८,२६६ नोंदीत व सक्रिय बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्यात आलेले असून ४४,८०० इतके गृहपयोगी वस्तू संच वाटप करण्यात आले आहे.

त्यामुळे सदर योजनांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.